
# आजादी का अमृत महोत्सव

आज़ादी का अमृत महोत्सव

# नारी सशक्तीकरण



*Editors* : Dr. D.S. Patwari, Dr. S.K. Baloure

Price : ₹ 400/-

KBC-Nano Publication Pvt. Ltd.
All Rights Reserved

© Publisher
ISBN : 13-978-93-83918-41-3

Registered Office :
A-3/2, Christian Colony,
Patel Chest, Delhi-110007

Correspondence Address :
57/12, Old Rajinder Nagar
(Near-Syndicate Bank)
Bazaar Marg, New Delhi-110060

Email : kbcnanopublication@gmail.com
Website : www.kumarbookscentre.com

Edition : 2022

Design & Layout by :
D. KBC-DTP Section (Delhi)

Printer :
Shakti Printer, Delhi
**Note :** *Due care and diligence has been taken while editing and printing the book, neither the author nor the Editor/Publisher of the book hold any*

10. महिला सशक्तिकरण: मुद्दे और चुनौतियाँ 65-73
-किरण नागराज वानखेड़े

11. ग्रामीण महिलाओं के सशक्तिकरण में स्वयं सहायता समूह की भूमिका का अध्ययन 74-79
-ममता गोयल (गोनेकर)
-डॉ. विजय कुमार गोनेकर

12. महिला मानव अधिकार एक विश्लेषण 80-86
-रविंद्र गणेशराव मोरताटे

13. स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे योगदान 87-97
-प्रा. प्रियंका राजेंद्र आठे

14. समाज परिवर्तनात स्त्री-शिक्षणाची भूमिका मांडताना स्त्री-समाज सुधारकांचे योगदान 98-106
-डॉ. प्रा. डोणे कुसुम बाबूराव

15. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील स्त्री योगदान 107-117
-प्रा. डॉ. अनिल एस. कांबळे

16. महिलाओं के अधिकार और समकालीन स्थिती 118-122
-प्रा. डॉ. के. यु. चौधरी

17. महिलांची पूर्वीची स्थिती व सधकालीन वर्तमान स्थिती 123-129
-प्रा. डॉ. विट्ठल चव्हाण

18. स्त्री मुक्तीचे प्रणेते महात्मा फुले 130-137
-प्रा. डॉ. धुमाळे डी. के.

19. भारतीय संविधान आणि महिला सक्षमीकरण 138-43
-डॉ. काळे संजय सदाशिव



20. भारतातील महिला आरक्षण धोरण 144-149
-डॉ. दत्ताजी हुलपा मेहते

21. महिलांचे राजकिय सशक्तीकरण 150-156
-प्रा. डॉ. संजय बी. गायकवाड
-श्री. सचिन कुमार लक्ष्मणराव मुळे

22. महिला संरक्षण कायदा आणि महिला सुरक्षा 157-163
-डॉ. स्वप्निल गोविंदराव मुळे,

23. ग्रामीण महिलांच्या सबलीकरणात महिला बचत गटाचे योगदान 164-170
-डॉ. विनायक रावसाहेब वाघमारे

24. स्त्री सबलीकरण आणि बचत गट 171-177
-प्रा. चंद्रकांत मोरे,

25. हैदराबाद स्वातंत्र्य संग्रामात महिलांचे योगदान 178-185
-डॉ. संजय भिमराव तोंडारकर

26. महिलांसाठी आरक्षण : महिला सक्षमीकरणाचा एक प्रयत्न 186-200
-प्रा. डॉ. दयानंद माधवराव गुडेवार

27. स्किल इंडिया आणि महिला शेतकरी 201-204
-डॉ. स्वाती हरिभाऊ कोटे

28. भारतीय संविधान आणि महिला : एक चिकित्सक अभ्यास 205-211
-प्रा. डॉ. वनमाला तोंडे

29. महिला सक्षमीकरण आणि मानवी हक्क 212-216
-प्रा. डॉ. संजय मारोतीराव कोनाळे

18

# स्त्री मुक्तीचे प्रणेते महात्मा फुले

प्रा. डॉ. धुमाळेडी. के.

**प्रस्तावना :-**

सातारा जिल्ह्यातील कटगुण या गावात जन्म झालेल्या ज्योतिबा फुले यांचा पेशव्यांच्या काळात फुले पुरविण्याचा धंदा होता. त्यावरून त्यांना फुले हे आडनाव मिळाले. पण त्यांचे मूळ आडनाव हे गोरे होते असं सांगितलं जातं. त्यांचे कुटुंब पुढे पुरंदर तालुक्यात खानवडी येथे गेले. आजही तिथे त्यांच्या नावाचा सातबाराचा उतारा आहे. तसंच खानवडीमध्ये अनेक फुले आडनावाची कुटुंबे आहेत. 28 नोव्हेंबर, 1890 रोजी ज्योतिबा फुले यांचा मृत्यू झाला. तर 11 एप्रिल रोजी त्यांची जयंती साजरी करण्यात येते.

संशोधनपध्दती :-

प्रस्तुत संशोधना साठी व्दितीय सामग्रीचा आधार घेण्यात आलाआहे. वर्तमान पत्रे मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट वरील माहिति आणि निरीक्षण पध्दती चावा पर करण्यात आलेला आहे.

गृहितकृत्ये :-

1) भारतातस्त्री-विकासासात धार्मिक व्यवस्थेचा आडसर होता.

2) भारतातस्त्री-विकासा साठीत्याकाळात अनुकूल परिस्थिती न व्हती.

3) भारतीय सविधाना त स्त्री सक्षमीकरणा साठी आवश्यक त रतूदी करण्यात आल्या आहेत.

4) भारतात स्त्री आणि पुरूष यांच्यात भेदभाव केला जात.

5) स्त्रीयांच्या विकासात देशाचा विकास अवलंबून आहे.

उदिष्टये :-

1)) भारतातील स्त्री-विकासाचा अभ्यासकरणे.

2) स्वातंत्र्य पूर्वकाळातील स्त्रीयांची पार्श्व भूमी अभ्यासणे .

3) स्त्रीयांच्या विकासास बाधकठरणाऱ्या गोष्टी अभ्यासणे.

4) स्त्रीयांच्या विकासासाठी महात्मा फुले यांनी केलेल्या कार्याचा अभ्यासकरणे.

बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले...' ही उक्ती सार्थ करणारे महात्मा फुले हे भारतीय इतिहासातले आद्य समाज क्रांतिकारक. आपले विचार प्रत्यक्ष आचरणात आणणारे ते बंडखोर युगपुरुष होते. आपली वैचारिक मांडणी, तीतून त्यांनी अनेक आघाड्यांवर लढा दिला. जाती प्रथा, ब्राह्मणी धर्माचे वर्चस्व, स्त्रियांचे शोषण, शेतकरी-कष्टकरी यांची पिळवणूक, सांस्कृतिक गुलामगिरी या सर्व आघाड्यांवर संघर्ष केला. त्यांचा हा संघर्ष सत्यशोधनावर आधारलेला होता.

'हिंदू समाजातल्या बहुजन समाजात आत्मप्रत्यय आणि आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे ज्योतिबा फुले होय. शतकानु शतके अज्ञानाने, दारिद्र्याने व हीन संस्कृती ने ग्रासलेल्या हिंदू समाजातल्या जनतेला आत्मपरीक्षण करण्याचा पहिला आदेश ज्योतिबांमुळे मिळाला', अशा शदबांत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी ज्योतिबांचा गौरव केला आहे. ज्योतिबांचे ध्येय होते 'एकमय लोक' आणि त्यांना समाजाचे नेमके दुखणे काय आहे याची जाण होती. म्हणूनच शोषित, पराभूत समाजाचा पर्यायी इतिहास लिहू पाहणारे फुले आपल्या इतिहासातली एक महत्वाची क्रांतिकारी शक्ती होती हे बिसरता कामा नये. स्त्रिया, दलित, कष्टकरी आणि शेतकरी यांचे होत असलेले शोषण सर्वात प्रथम फुलेंना जाणवले. ज्योतिबांनी १८४८ मध्ये

मुलींसाठी पहिली शाळा पुण्यात सुरू केली. बहुजन समाजाला, अस्पृश्यांना आणि त्यातही प्रामुख्याने स्त्रियांना शिक्षण द्यावे असा आग्रह त्यांनी केला. ऐतिहासिक दृष्ट्या ही घटना अत्यंत महत्वाची होती. आज शतकानंतरही तळागाळातील स्त्रियांचे जगणे अपार कष्ट सोसण्यातच जाते.

भारतीय समाजरचना बहुपेडी आणि विषम आहे. या शोषित-पीडित-वंचित समाजाला आहे तेथेच ठेवून फक्त कल्याणकारी सुधारणांच्या नावाखाली वरवरच्या उपाययोजना करून प्रश्न सोडवणे ज्योतिबांना मान्य नव्हते. ब्राह्मणी धर्माची, प्राचीन पोथ्या, पुराणांची, जुन्या धर्मग्रंथांची आणि त्यातून उदयास आलेल्या सामजिक मूल्यांची ज्योतिबांनी परखड चिकित्सा केली. त्यांनी सार्वजनिक सत्यधर्माची नवीन संकल्पना मांडली. अंधश्रद्धा, चमत्कार यांच्यावर ताशेरे ओढले. सत्य आणि विवेक या नवमूल्यांचे रोपण केले. महाराष्ट्राचा इतिहास सांगणारा पोवाडा रचला. यातून शिवाजी महाराजांना 'कुळवाडी भूषण' म्हणून शेतकरी समाजाचा हितचिंतक आणि संरक्षक या रुपात पुढे आणले.

ज्योतिबा फुलेंच्या पुण्यातल्या शाळेत शिकणाऱ्या एका ११ वर्षांच्या मुलीने लिहिलेला निबंध महत्वाचा आहे. ही मुलगी मातंग समाजाची होती. यात विचारलेले प्रश्न मूलगामी होते. तिच्या या मांडणीचे श्रेय जोतिबांना जाते. 'सार्वजनिक सत्यधर्म' या पुस्तकातला 'स्त्री आणि पुरुष' हा संवाद त्यांची विचारधारा सांगणारा आहे. या पुस्तकात उच्च-नीच उतरंडीचा विरोध करणारी, श्रमिकांना सन्मान देणारी, लोकशाहीपूरक आणि शोषण विरोधी मूल्ये आपल्या विशिष्ट शैलीत मांडली आहेत. स्त्रियांचा विशेषत्वाने केलेला उल्लेख हे या मांडणीचे अजून एक वैशिष्ट! स्त्री-पुरुष समानतेचे महत्व आग्रहाने मांडले आहे. 'आज आपल्याकडे मतदानाचा हक्क न झगडताच मिळाला पण त्याने आमच्या समाजव्यवस्थेला धक्कासुद्धा पोहचत नाही. मुकेपणाने सोसणाऱ्या स्त्रियांच्या हाती घराचा, समाजाचा आणि राज्याचा कारभार द्यायचा झाला तर त्यांना आपल्याला काय हवे, काय नको हे बोलण्याचे बळ आणि निर्भयता हवी. हे निर्माण करण्याचा पहिला प्रयत्न ज्योतिबांनी केला हे त्यांचे फार मोठे श्रेय आहे,' असे मत ज्येष्ठ स्त्रीवादी



विचारवंत विद्युत भागवत यांनी व्यक्त केले आहे.

ज्योतिबांनी बालविवाह, सती प्रथा, जरठ कुमारिका या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. फुल्यांच्या समकालीनांमध्ये आगरकरांनी स्त्री-पुरुष समानतेचा विचार बंडखोर प्रवृत्तीने मांडला. लोकहितवादी अर्थात गोपाळ हरी देशमुख हे केवळ बोलके सुधारक असल्याचे त्यांच्यातीतून सिद्ध झाले आहे. न्या. रानडे यांनी आयुष्यभर विधवा पुनर्विवाहाचे समर्थन केले. पण ते विधूर झाल्यावर मात्र त्यांनी विधवेशी विवाह न करता कुमारिकेशी केला. न्या. रानडे यांचे पट्टशिष्य ना. गोखले. यांनी तर पहिली बायको जिवंत असताना दुसरे लग्न केले. रानडे यांचे अग्रणी न्या. तेलंग यांनी आपल्यां मुलीचा विवाह भरपूर हुंडा देवून आठव्या वर्षीच केला. या पार्श्वभूमीवर फुल्यांचे वेगळेपण उठून दिसते. अपत्य होत नाही म्हणून त्यांनी दुसरा विवाह केला नाही. तसेच विधवा ब्राह्मण काशीबाईच्या मुलाला, यशवंत यास दत्तक घेऊन एक वेगळा आदर्श घालून दिला. सावित्रीबाई, फातिमा बी, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे, पंडिता रमाबाई, आनंदीबाई जोशी यांच्या कार्यामागची प्रेरणा फुलेच आहेत. खरोखरच महात्मा जोतिबा फुले हे भारतीय स्त्रीमुक्ती चळवळीचे आद्यप्रणेते ठरतात.

शिक्षण हा जीवनाचा आधार आहे. शिक्षणापासून आपण आपणास वेगळे करू शकत नाही. प्रत्येक व्यक्ती हा शिक्षण देणारा एक महत्वपूर्ण ग्रंथ आहे. केवळ त्याच्याकडून आपण काय घ्यावे हे आपणास कळायला पाहिजे. शिक्षण ही जीवन जगण्याची गुरुकिल्ली आहे. जीवन म्हणजे काय? जीवन का जगावे, जीवन कसे जगावे, जीवनाची सार्थकता कशामध्ये आहे, जीवन पूर्ण कसे करावे. आपण जीवनातून काय घ्यावे व इतरांना काय द्यावे. या सर्व प्रश्नांची उत्तरे म्हणजे शिक्षण होय. म्हणूनच' शिक्षणानेच सर्व काही होत आहे, त्याकरिता आधी शिक्षण घेतलेच पाहिजे' जीवन शिक्षण ही काळाची गरज बनली आहे आणि आपल्या सर्व थोर शिक्षणतज्ज्ञांनी, विचारवंतांनी, समाजसुधारकांनी जीवन शिक्षणाची धुरा सांभाळली आहे आणि सर्वांना जगण्याची एक दशा आणि दिशा देण्याची महत्वपूर्ण कामगिरी बजावली आहे. 21 व्या शतकामध्ये शिक्षण घेणारा समुदाय मोठ्या प्रमाणात वाढला

आहे. पण त्यातून जीवनविषयक शिक्षण मिळत आहे काय? हा प्रश्न अनुत्तरीतच आहे. तेव्हा आपल्या शिक्षणतज्ज्ञांचे आजच्याशिक्षणातून व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार निश्चितच येणा-या भविष्यकालीन समस्यांचे निराकरण व उत्तम जीवन जगण्यासाठी दिशादर्शक ठरतील. यामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, राजर्षी शाहू आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार मार्गदर्शनपर आहेत. शिक्षण आणि अभ्यासक्रमामध्ये जे विचार आहेत. ते याच थोरांचे आहेत.

महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण व अभ्यासक्रमातून प्रकट होणारे विचार - स्वातंत्र्य, समता आणि बंधुभाव या त्रयीवर नितांत भरवसा ठेवणारे आणि सामाजिक विषमतेच्या विरोधात आवाज उठविणारे म. फुले हे महापुरुष होते. त्यांना महाराष्ट्राचे मालटन ल्यूथर म्हणून ओळखले जाते. ते मानवतावादी विचाराचे होते. त्यांनी मेक०लेच्या खलित्यास कडाडून विरोध 'शिक्षण हे वरच्या वर्गापासून खालच्या वर्गापर्यंत पाझरत आले पाहिजे' या विचारास फुलेंचा विरोध होता कारण इंग्रजाचा भर प्रथम वरचा वर्ग शिकला पाहिजे व नंतर खालचा वर्ग शिकावा यावर होता. 'प्रथम खालच्या वर्गातील लोकांना शिक्षण देऊन नंतर वरच्या वर्गातील लोकांना शिक्षण दयावे 'आधी कळस मग पाया असे न होता, आधी पाया मग कळस' अशा पद्धतीने शिक्षणप्रणाली असण्यावर म. फुलेंचा आग्रह होता. प्रथम उपेक्षितांना शिक्षण नंतर अपेक्षितांना शिक्षण' हे सूत्र अंमलात आणावे, यावर भर देण्यात आला.

**महात्मा फुलेंचे शिक्षण विषयक विचार**

स्त्री-शिक्षणाचा पाठपुरावा - पूर्वीच्या काळामध्ये या परिस्थितीत स्त्रियांनी शिक्षण घेणे. म्हणजे अधर्मच करणे होय. त्यामुळे स्त्रियांसाठी शिक्षणाची दारे कायमची उघडली जावी, म्हणून म. फुलेंनी स्त्री-शिक्षण मोहीम सर्वप्रथम हाती घेतली. शिक्षण हे समर्थ स्त्री म्हणून जगण्यासाठी दिले जावे. स्त्रियांचा खरा धर्म त्यांना शिक्षण देणे होय. स्त्रियांच्या मानसिकतेसाठी व सक्षम स्त्री घडवण्यासाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. हे ओळखून म. फुलेंनी आपल्या पत्नीस शिक्षण देऊन आदय शिक्षिका म्हणून कार्यास सुरुवात केली आणि स्त्री-शिक्षण मोहमेस सुरुवात केली.



प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत - प्राथमिक शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे आणि त्यामुळे हे शिक्षण मिळणे आवश्यक आहे. तसेच म. फुले प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत असावे या विचारांचा पुरस्कार करणारे प्रथम भारतीय नागरिक होते. ही मागणी त्यांनी १९ ऑक्टोबर 1882 मध्ये हंटर शिक्षण आयोगापुढे एका शिक्षणावर अधिक भर देईल तर नीतीच्या आणि सवंर्द्धनाच्या दृष्टीने कितीतरी चांगले लोक शिकून तयार होताना मुळीच अडचण पडणार नाही. या विचारातून त्यांनी प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत करण्यावर भर दिला.

प्राथमिक शिक्षकांची तरतूद करणे - प्राथमिक शिक्षणास मोफत व सक्तीचे केल्यास विदयार्थ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची शक्यता होती आणि त्याकरिता दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रशिक्षित शिक्षक असणे देखील आवश्यक आहे आणि त्याकरिता प्रथम आवाज उठविणारे म. फुले हे एकमेव व्यक्ती होते. प्राथमिक शिक्षण हा जीवनाचा पाया आहे. त्यामुळे या स्तरावरील शिक्षण उत्तम दर्जाचे असावे. यावर अधिक भर देण्यात आला.

प्राथमिक शिक्षणाकडे लक्ष देणे - सरकारी नोक-यांमध्ये सर्व वरिष्ठ वर्गाची मक्तेदारी आहे, असे दिसून आल्यावर शिक्षण खालच्या वर्गातील तळागाळातील लोकांना मिळावे. यासाठी म.फुले यांनी प्राथमिक शिक्षण खालच्या वर्गास देण्यावर अधिक भर दिला. उच्च शिक्षणाकडे कमी व ग्रामीण जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे जास्त लक्ष देणे आवश्यक आहे. प्राथमिक शिक्षणातून उद्याची भावी पिढी घडत असते आणि आज जे प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले आहे. त्यामागे म. फुलेंचे विचार, असलेले दिसून येतात. आपल्या देशामध्ये आजची परिस्थिती लक्षात घेता कमी शिकलेले अध्यापक व अनुभव कमी असलेले शिक्षक प्राथमिक स्तरावर अध्यापन करताना दिसतात आणि अधिक अनुभवी व विषयतज्ज्ञ अध्यापक वर्ग वरच्या वर्गास अर्थात उच्च स्तर अध्यापन करतात. तेव्हा वेळोवेळी प्राथमिक शिक्षण अधिक दर्जेदार व गुणवत्तापूर्ण देणे ही काळाची गरज बनली आहे आणि त्या दृष्टीकोनातून विचार म. फुलेंनी व्यक्त केले.

ग्रामीण भागातील मुलामुलींचे शिक्षण - बहुजन समाज ग्रामीण भागामध्ये राहत असल्याने, त्यांच्या शिक्षणाची म. फुले यांना अधिक काळजी वाटत असे. 2 मार्च 1888 मध्ये म. फुले म्हणाले होते की आपली बहुतांश जनता खेड्यात निवास करते. तेव्हा शासनाने ग्रामीण लोकांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पुरवावे. राष्ट्रनिर्माणासाठी शुद्रांना शिक्षण - आपल्या देशात बहुजन समाज अजाण व अडाणी आहे. त्यांच्या उद्धारासाठी. शिक्षण हा एकमेव उपाय आहे. शुद्रांना शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याशिवाय राष्ट्र बनू शकत नाही. ज्या देशात सामाजिक आणि आलथक गुलामी असते तेथे राष्ट्रवाद निर्माण होऊ शकत नाही. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली झाली पाहिजे. यावर अधिक भर होता.

शिक्षण प्रणालीत आमूलाग्र बदल - म. फुले यांच्या मते आजची शिक्षण पद्धती ही बहुजन समाजाला शिक्षणपासून वंचित करणारी होती. तेव्हा शिक्षणप्रणाली बदलली पाहिजे यावर अधिक भर दिला गेला. केवळ कारकून वर्ग तयार करणा-या वर्गाची निलमती शिक्षणातून होऊ नये, तर मानवी जीवन जगण्यास सक्षम बनवणारे, उदद्योगी, जीवनोपयोगी शिक्षण देण्यात यावे.

त्रिभाषा सूत्रचा अवलंब - (1964-66) च्या कोठारी आयोगाने त्रिभाषा सूत्रस जरी आजच्या कालावधीत मान्यता दिलेली असली तरी या अगोदर 77 वर्षापूर्वी म. फुले यांनी त्रिभाषा सूत्रचा अवलंब शिक्षणात करावा यावर भर दिला होता.

शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा - जनसामान्यामध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा ह्यासाठी खेड्यापाड्यातील जनतेला शिक्षण घेता यावे म्हणून वसतिगृहाची व्यवस्था करण्याची कल्पना म. फुले यांनी मांडली आणि गरीब, होतकरू मुलांसाठी शिष्यवृत्ती व वसतिगृहाची सुविधा देण्यावर भर दिला.

शिक्षणाविषयक ज्ञान व विचार - शिक्षण हा तिसरा डोळाच मानले जाते आणि त्यामुळेच म. फुले यांनी शिक्षणावर अधिक प्रकाश टाकला आहे आणि शिक्षण कोणत्याही एका व्यक्तीची मक्तेदारी न बनता, सर्वांना शिक्षण



मिळावे, शिक्षणाचा प्रसार होऊन, ज्ञान व विचारांची वृद्धी व्हावी यासाठी म. फुलेंनी योगदान दिले. म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून स्त्रियांसाठी तसेच मागासलेल्या अनाथाच्या शिक्षणासाठी सुविधा उपलब्ध करून दिल्या. तसेच बालगृहाची स्थापना देखील केली. अशाप्रकारे म. फुले यांनी समाज परिवर्तनाचे कार्य करताना स्वतःच्या घरदाराचाही विचार न करता काम केले आणि म्हणून आज आपला समाज मानाने सर्व प्रकारचे शिक्षण घेत आहे. अशा शिक्षणतज्ज्ञाला, शिक्षणमहर्षीच्या कार्याला कोटी-कोटी वंदन.

**संदर्भग्रंथः-**


1) आधुनिक भारतीय राजकीय विचार वंत : डॉ. वा.भा. पाटील

2) भारतीय राज्य घटना : डॉ. शुभागीराठी

3) राजकीय विचारवंत : डॉ. ना.य. डोळे

4) भारतीय राजकीय विचारवंत : डॉ. भूषण कुमार जोर गुलवार